# प्रेसनोट

दिनांक- ३१/१२/२०१८.

## कर्जत नगरपालिका, करविभाग येथील लिपिकांस लाच स्विकारताना अटक

दिनांक ३१/१२/२०१८ रोजी, कर्जत नगरपालिका, करविभाग येथील लिपिक **दिलीप काशीनाथ गायकवाड वय-५२ वर्षे व लिपिक रमेश विश्वनाथ लाड वय-५५वर्षे** यांना यातील तक्रारदार यांच्याकडून १३,५०० /- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असुन, त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या मित्राची मालमत्ता करावरील दंडाची रक्कम कमी करुन देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १३,५००/- रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्याकडे तक्रार नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन अेसीबी, ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक **दिलीप काशीनाथ गायकवाड** यांना तक्रारदार यांच्याकडून १३,५००/- रुपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले असून, लोकसेवक **रमेश विश्वनाथ लाड** यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

-------------------------------------------------------------------------

**१) टोल फ्री क्र. :- १०६४**
**२) दुरध्वनी क्रमांक :- ०२२-२५४२७९७९**
**३) ई-मेल आयडी :- spacbthane@mahapolice.gov.in**
**४) वेबसाईट :- www.acbmaharashra.gov.in**